वर्ष : ०५ | अंक: १३ | मुंबई, मंगळवार १९ फेब्रुवारी २०१९ ते २५ फेब्रुवारी २०१९ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

Website: www.policebatmipatra.com www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 बोरिवली-ठाणे जलद मार्ग मोकळा!

3 → पाकला जरबच गरजेची

काही शिवसेना नेत्यांमुळे रिफायनरी विरोध बॅकफूटवर ← 4

## अखेर भाजप–शिवसेनेचं जमलंच!

### हिंदुत्वासह लोकांच्या भावनेचा मुद्दा पुढे करून पुन्हा युती

**मुंबई - आगामी निवडणुका आता काहीच दिवसांवर येऊन ठेपल्या आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून शिवसेना-भाजपच्या युतीबाबत संभ्रम कायम होता. शिवसेना-भाजपची युती होणार का? या दोघांपैकी महाराष्ट्रात मोठा भाऊ कोण ठरणार?, याबाबतच्या चर्चा राजकीय वर्तुळात रंगात होत्या. मात्र, आता अखेर भाजप-शिवसेनेच्या युतीचा तिढा सुटला आहे. वारंवार स्वबळाचा नारा देणाऱ्या शिवसेनेने अखेर भाजपसोबत युती केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजप-शिवसनेच्या युतीची अधिकृत घोषणा केली आहे. लोकसभेसाठी शिवसेनेला २३ तर भाजपला २५ जागा तर विधानसभेसाठी ५०-५० जागांचा फॉर्म्युला निश्चित झाला आहे.**



शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शाह यांनी सोमवारी (१८ फेब्रुवारी) संध्याकाळी घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत भाजप-सेनेच्या युतीबाबत अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. गेल्या ५ वर्षात भाजपसोबत असताना देखील शिवसेनेने कायमच विरोधी पक्षाची भूमिका बजावली. शिवसेनेने भाजपवर टीका करण्याची एकही संधी सोडली नाही. परंतु, अखेर आगामी निवडणुकांसाठी हे दोन्हीही पक्ष पुन्हा एकदा एकत्र आले आहेत.

**भाजप-शिवसेनेच्या संयुक्त पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस काय म्हणाले ?**

- भाजप-शिवसेनेची युती व्हावी ही लोकांची भावना
- आगामी लोकसभा, विधानसभा निवडणुकांसाठी भाजप-सेनेची युती
- लोकसभेसाठी शिवसेना २३ तर भाजप २५ जागांचा फॉर्म्युला
- काही मुद्द्यांमुळे शिवसेना-भाजपमध्ये मतभेद होते
- शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी शिवसेना आग्रही
- भाजप-शिवसेनेची युती ही देशहितासाठी
- नाणार प्रकल्पाची जागा बदलणार, लोकांच्या मान्यतेनुसार होणार प्रकल्प
- मित्रपक्षांना जागा देऊन उरलेल्या जागांमध्ये वाटप

**भाजप-शिवसेनेच्या संयुक्त पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे काय म्हणाले ?**

- राम मंदिराच्या मुद्द्यावर आम्ही भाजपसोबत
- समज-गैरसमज बाजूला ठेऊन नवी सुरुवात करीत आहोत




## यूएलसीची ६०० कोटींची जमीन विकली, पाच जणांवर गुन्हा दाखल



**मीरा रोड-** नागरी जमीन कमाल धारणा कायद्याखाली हस्तांतरणास बंदी असलेली कोट्यवधी रुपयांची जमीन परस्पर विक्री केल्याप्रकरणी ठाणे नागरी संकुलन विभागाच्या तक्रारीनंतर काशिमीरा पोलीस ठाण्यात पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. धक्कादायक बाब म्हणजे, हस्तांतरणास बंदी असताना विक्री व्यवहाराची झालेली नोंदणी, सातबारा सदरी झालेला फेरफार आणि महापालिकेने या ठिकाणी तब्बल २२ मजल्यांच्या सात टॉवरना दिलेली परवानगी संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. बाजारभावाप्रमाणे या जमिनीची किंमत सुमारे ६०० कोटींच्या घरात असून, यात शासनाचे काही कोटींचे नुकसान व फसवणूक

उर्वरित पृष्ठ 2 वर

## ‘रयतेचा वाली, जाणता राजा’- शिवजयंती महोत्सव



**भाईंदर-** मराठी एकीकरण समिती (महाराष्ट्र राज्य) या आमच्या संघटनेतर्फे आपले सर्वांचे आराध्य दैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मिरा-भाईंदर शहरात ‘रयतेचा वाली, जाणता राजा’ या नावाने, भव्य-दिव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. ‘न भूतो’ अशा स्वरूपात मिरा-भाईंदर मधील ३५ हून अधिक मंडळांचा पाठींबा व तमाम महाराष्ट्रप्रेमी, शिवप्रेमींच्या आशीर्वादाने, आमच्या बिगर राजकीय चळवळीतून, शिवाजी महाराजांचे चरित्र, प्रतिकूल परिस्थितीतील त्यांचे व्यवस्थापन धाडस, कौशल्य, त्यांचा गनिमीकावा, युद्धनिती, राज्यकारभाराची निती, त्यांच्या संकल्पनेतील हिंदवी स्वराज्य व सुराज्य याविषयी आताच्या तरुणपिढीला कळावे व आजच्या सामाजिक व राजकीय परिस्थितीतीत त्यांच्या आदर्श विचारांचे महत्व आबाल-वृद्धांना

उर्वरित पृष्ठ 2 वर

## कारगिलसारख्या युद्धाचे संकेत



**जम्मू- पुलवामा हल्ल्याचा बदला म्हणून दहशतवाद्यांना सडेतोड उत्तर देण्यासाठी भारत पाकिस्तानवर थेट हल्ला करणार नाही. तथापि, सीमेवर कारगिलसारखे लघुयुद्ध होऊ शकते, हे मात्र निश्चित आहे. अशी शक्यता यामुळे वर्तवली जात आहे की, सरकारने सैन्यदलांना कारवाईचे संपूर्ण स्वातंत्र्य दिल्याने भारतीय लष्कराने हल्ल्याची तयारी सुरू केली आहे. लष्करी अधिकाऱ्यांनी नाव न छापण्याच्या अटीवर बोलताना सांगितले की, यासंदर्भात सरकारकडून हिरवा झेंडा मिळाला आहे. भारतीय लष्कर जोरदार प्रत्युत्तर देण्याची तयारी करीत आहे. लष्कराच्या उत्तर कमांडचे अनेक अधिकारीही असे संकेत देत आहेत. उरी हल्ल्याचा बदला म्हणून केलेल्या सर्जिकल स्ट्राईकची जबाबदारी उत्तर कमांडवर सोपविण्यात आली होती. ही जबाबदारी उत्तर कमांडने यशस्वीरीत्या पार पाडली होती.**

उर्वरित पृष्ठ 2 वर

### पाकच्या आर्थिक नाड्या आवळणार

**नवी दिल्ली-** पुलवामा दहशतवादी हल्ल्यातील पाकिस्तानच्या सहभागाबाबतचे पुरावे पॅरिस येथील फिनॅन्शिएल ॲक्शन टास्क फोर्स (एफएटीएफ) या आंतरराष्ट्रीय संस्थेकडे सुपूर्द करण्यात येणार आहेत. पाकची आंतरराष्ट्रीय स्तरावर आर्थिक नाकेबंदी करण्याच्या दिशेने केंद्र सरकारने जोरदार हालचाली सुरू केल्या आहेत. त्याच्या अनुषंगाने या संघटनेकडे पाकच्या कुरापतीविरोधात भक्कम पुरावे सादर करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. पाकस्थित जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेने जम्मू-काश्मीरमधील पुलवामा या ठिकाणी आत्मघाती दहशतवादी हल्ला घडवून आणला. ‘जैश’चा म्होरक्या मसूद अझर याने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे.



पाकिस्तानातील गुप्तचर संस्था आणि पाक लष्कराकडून मसूदला भारतविरोधात कारवाया करण्यासाठी रसद पुरविली जाते. याबाबतचे पुरावे पॅरिसमधील आंतरराष्ट्रीय संघटनेकडे सोपविण्यात येणार असल्याची माहिती उच्चपदस्थ सूत्रांनी दिली.

## भारताला उत्तर देण्याचा पूर्ण अधिकार, आम्ही सोबत आहोत- अमेरिका

***वॉशिंग्टन - जम्मू-काश्मीरमधील पुलवामा येथे सीआरपीएफच्या जवानांवर झालेल्या हल्ल्यानंतर अमेरिकेने प्रतिक्रिया दिली आहे. अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जॉन बोल्टन यांनी भारताचे सुरक्षा सल्लागार अजित डोवल यांना फोन केला. दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी अमेरिका भारतासोबत असल्याचे बोल्टन यांनी सांगितले.***



बोल्टन यांनी डोवल यांना फोन करु शहीद झालेल्या जवानांबद्दल शोक व्यक्त केला. दहशतवादाच्या विरोधात आम्ही भारतासोबत असल्याचे त्यांनी सांगितले. जम्मू-काश्मीरमध्ये झालेल्या घटनेला उत्तर देण्याचा तसेच स्वत:चे संरक्षण करण्याचा भारताला पूर्ण अधिकार असल्याचे बोल्टन यांनी सांगितले. विशेष म्हणजे पुलवामा येथे झालेल्या हल्ल्यानंतर बोल्टन यांनी दोन वेळा फोनवरून डोवल यांच्याशी चर्चा केली आहे. दहशतवादाविरुद्ध आमची भूमिका स्पष्ट आहे. याबाबत आम्ही पाकिस्तानसोबत चर्चा करत आहोत. पुलवामा येथे झालेल्या हल्ल्यातील मास्टरमाईंडवर कारवाई झालीच पाहिजे, असे बोल्टन म्हणाले. गुरुवारी पुलवामा येथे सीआरपीएफच्या ताफ्यावर दहशतवादी हल्ला झाला होता. यात ४० जवान शहीद झाले आहेत. तर अनेक जण जखमी झाले आहेत. दरम्यान, अमेरिकेच्या गृहखात्याने देशातील नागरिकांना अत्यंत गरज असेल तरच पाकिस्तानमध्ये जा असा सल्ला दिला आहे.

बोल्टन यांच्याआधी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पाकिस्तानने प्रथम दहशतवादी संघटनांना आश्रय देणे बंद करावे. पाकच्या भूमीवरून दहशतवाद्यांना मदत आणि संरक्षण दिले जाते.

## शहिदांच्या कुटुंबांना पोलिसांचा पगार
## ३० लाखांची मदत देणार

**कोल्हापूर -** काश्मीरमधील पुलवामा येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात शहीद झालेल्या महाराष्ट्रातील जवानांच्या कुटुंबीयांसाठी कोल्हापूर पोलीस एक दिवसाचा पगार देणार आहेत. पोलीस अधीक्षक कार्यालयात शनिवारी झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. सुमारे ३० लाखांची मदत केली जाणार असल्याची माहिती अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख यांनी दिली.



दहशतवाद्यांनी गुरुवारी दुपारी पुलवामा येथे जवानांच्या वाहनांच्या ताफ्यावर हल्ला केला. या हल्ल्यात महाराष्ट्रातील बुलडाणा जिल्ह्यातील दोन जवान शहीद झाले आहेत. शहीद जवानांच्या मदतीसाठी कोल्हापूर पोलीस सरसावले आहेत. पोलीस अधीक्षक कार्यालयात शनिवारी सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत मदतीचा निर्णय घेण्यात आला. जिल्ह्यातील पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा एक दिवसाचा पगार शहिदांच्या कुटुंबीयांना दिला जाणार आहे. जिल्ह्यात तीन हजार पोलीस आहेत. केंद्रीय गृह मंत्रालयाने जाहीर केलेल्या वेबसाइटवरील बँक खात्यांवर पोलिसांकडून ३० लाखांची रक्कम जमा केली जाणार आहे. ही मदत बुलडाणा जिल्ह्यातील नितीन राठोड व संजय रजपूत यांच्या कुटुंबीयांना मिळणार आहे, अशी माहिती अधीक्षक देशमुख यांनी दिली.



# बोरिवली–ठाणे जलद मार्ग मोकळा!

## राष्ट्रीय उद्यानातून 'टीबीएम'द्वारे भुयारी मार्ग काढणार; उद्यान प्रशासनाची मान्यता

**मुंबई - बोरिवली आणि ठाणे यादरम्यानचे अंतर किमान ४० मिनिटांनी कमी करणाऱ्या सहापदरी मार्गाच्या आखणीतील महत्त्वाचा अडथळा दूर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या रस्त्यासाठी बोरिवलीतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून भुयारी मार्ग काढावा लागणार आहे. हा भुयारी मार्ग 'टनल बोअरिंग मशीन'च्या (टीबीएम) मदतीने खोदण्यावर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) आणि राष्ट्रीय उद्यान प्रशासनात एकमत झाले असून आता हा प्रस्ताव नागपूर येथील वनविभागाच्या मुख्यालयाकडे पाठवण्यात आला आहे.**



बोरिवली-ठाणेदरम्यानचा हा राष्ट्रीय उद्यानातून जाणारा ११ किमीचा सहापदरी मार्ग आहे. यामुळे बोरिवली-ठाणे हा सध्या एक तासाचा असलेला प्रवास २० मिनिटांवर येणार आहे. हा भुयारी मार्ग बोरिवलीच्या पश्चिम द्रुतगती महामार्गावरील एकता नगर येथून सुरू होऊन ठाण्याच्या टिकुजिनी-वाडी परिसरातून बाहेर पडेल. या प्रकल्पासाठी सुमारे ३ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या मार्गाचे भुयारीकरण कसे करायचे याबाबत 'एमएसआरडीसी'ने बंगळुरू येथील 'नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ रॉक मॅकेनिझम' या संस्थेकडून अहवाल मागवला होता. त्यात स्फोटके वापरून भुयारीकरण करण्याची सूचना करण्यात आली होती. मात्र यामुळे उद्यानातील जैवविविधतेला बाधा पोहोचेल असे उद्यान प्रशासनाचे म्हणणे होते. त्यामुळे आता 'टीबीएम'ने भुयारीकरण करण्याचा महागडा पर्याय एमएसआरडीसीने स्वीकारला आहे. राष्ट्रीय उद्यान प्रशासनानेही अनुकूलता दर्शवली आहे. गोरेगाव-मुलुंड भुयारी जोडरस्त्याला उद्यान प्रशासनाने नुकतीच मान्यता दिली. त्याला समांतर असलेल्या 'एमएसआरडीसी'च्या भुयारी मार्गालाही परवानगी देण्यात आली आहे. तो नागपूरच्या वन विभागाच्या मुख्यालयाकडे पाठवण्यात आला असून त्यानंतर त्याला केंद्र सरकारची मंजुरी घ्यावी लागणार आहे. 'टीबीएम' वापरल्याने या प्रकल्पाच्या खर्चात वाढ होणार असल्याचे एमएसआरडीसीच्या एका अधिकाऱ्याने सांगितले.

वनक्षेत्रामधील जैवविविधता लक्षात घेता स्फोटकाद्वारे खणण्यात येणाऱ्या बोरिवली-ठाणे भुयारी मार्गाचा 'एमएसआरडीसी'चा प्रस्ताव आम्ही फेटाळला होता. मात्र आता त्यांनी टीबीएम यंत्राच्या आधारे भुयारीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. हा प्रस्ताव आम्ही स्वीकारला असून तो पुढील परवानगीसाठी नागपूरला वन विभागाच्या मुख्यालयाकडे पाठविण्यात आला आहे.

# गैरवर्तणुकीबद्दलच्या दोषीला पेन्शनचा हक्क नाही

***मुंबई - गंभीर गैरवर्तणुकीबद्दल दोषी ठरलेल्या आणि नैतिक अध:पतनाचा ठपका असलेल्या कर्मचाऱ्याला पेन्शन मिळण्याचा निर्विवाद हक्क असू शकत नाही, असा निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाने मुंबईतील एका कॉलेजातील माजी शिक्षकाबद्दलच्या प्रकरणानिमित्ताने नुकताच दिला आहे. आपल्या बडतर्फीपूर्वीच्या सेवेबद्दलचे पेन्शन मिळावे, अशा विनंतीची या शिक्षकाची याचिकाही उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे.***

वडाळामधील एका कॉलेजमध्ये शशिकांत कुलकर्णी हे व्याख्याते होते. त्यांची नेमणूक १९८९मध्ये करण्यात आली होती. नंतर १९९५मध्ये एका मुलीने त्यांच्याविरोधात विनयभंगाची तक्रार दाखल केल्यानंतर कॉलेज प्रशासनाने चौकशी करून त्यांना निलंबित केले. या प्रकरणातील फौजदारी प्रकरणातून त्यांची निर्दोष सुटका झाली. मात्र, कॉलेज प्रशासनाने अंतर्गत चौकशी करून त्यांना दोषी ठरवले आणि सेवेतून बडतर्फ केले. कालांतराने हे प्रकरण कॉलेज न्यायाधिकरणासमोर गेले. त्या न्यायाधिकरणानेही त्यांना दोषी ठरवले. शिवाय नंतर न्यायाधिकरणाच्या विरोधात त्यांनी केलेले अपिलही मुंबई उच्च न्यायालयाने २००८मध्ये फेटाळून लावले. न्यायाधिकरण व उच्च न्यायालयाने अत्यंत गंभीर गैरवर्तणुकीबरोबरच चौकशीतील निष्कर्षांवरून नैतिक अध:पतनाचाही ठपकाही आपल्या निर्णयांमध्ये नोंदवला होता.

मात्र, आपल्याला सेवेतून बडतर्फ करण्यात आले असले तरी त्याआधीच्या सेवेबद्दलचे पेन्शन, ग्रॅच्युईटी, पीएफ याबद्दलचे लाभ मिळणे हा आपला हक्क आहे, असा दावा करत कुलकर्णी यांनी २३ सप्टेंबर २०११ रोजी कॉलेज प्रशासनाकडे पत्राद्वारे मागणी केली होती. मात्र, कॉलेज प्रशासनाने ती फेटाळून




लावली. त्याविरोधात कुलकर्णी यांनी उच्च न्यायालयात रिट याचिका केली होती. त्याविषयीच्या सुनावणीअंती राखून ठेवलेला आपला निर्णय न्या. सत्यरंजन धर्माधिकारी व न्या. मकरंद कर्णिक यांच्या खंडपीठाने नुकताच सुनावला. त्यात कॉलेज प्रशासनाचा निर्णय योग्य असल्याचे स्पष्ट करून खंडपीठाने कुलकर्णी यांची याचिका फेटाळून लावली. 'महाराष्ट्र नागरी सेवा(पेन्शन) नियम, १९८२च्या नियम २६ व २७ अन्वये कर्मचारी गंभीर गैरवर्तणुकीबद्दल दोषी ठरल्यास पेन्शन रोखणे व मागे घेण्याबरोबरच वसूल करण्याचाही सरकारला अधिकार आहे. एखादा कर्मचारी निवृत्त असला आणि त्याच्याविरुद्धच्या विभागीय चौकशीत तो गंभीर गैरवर्तणुकीबद्दल दोषी ठरला तर त्याचे पेन्शनही जप्त केले जाऊ शकते. त्यामुळे या प्रकरणातही पेन्शन हा निर्विवाद हक्क नसून तो नियमांच्या अधीनच आहे',असा निर्वाळा खंडपीठाने आपल्या निकालात दिला.

## पुलवामा हल्ल्यानंतर शबाना-जावेद अख्तर यांनी पाकिस्तान दौरा केला रद्द

**मुंबई -** पुलवामा येथील दहशतवादी हल्ल्यानंतर गीतकार जावेद अख्तर आणि त्यांची पत्नी अभिनेत्री शबाना आझमी यांनी कराचीचा नियोजित दौरा रद्द केल्याचं ट्विटरद्वारे जाहीर केलं. त्यांनी कैफी आझमी जन्मशताब्दी सोहळ्यात सहभागी न होण्याचा निर्णय घेतला.




कराची कला परिषदेनं त्यांना दोन दिवसीय सोहळ्यासाठी निमंत्रित केलं होतं. ताजी प्रतिक्रियाहृया दोन्ही हाऱ्खोरांना कायमच पाकिस्तानात पाठवून द्या. जावेद अख्तर यांनी ट्विट करून कराचीचा दौरा रद्द केल्याचं जाहीर केलं. 'कराची कला परिषदेनं मला आणि शबाना आझमींना कैफी आझमी जन्मशताब्दी सोहळ्यासाठी निमंत्रित केलं होतं. मात्र, हा दौरा आम्ही रद्द केला आहे,' असं त्यांनी ट्विटमध्ये म्हटलं आहे. 'माझं सीआरपीएफ जवानांशी एक खास नातं आहे. मी त्यांच्यासाठी एक गौरवगीत लिहिलं होतं. ते लिहिण्याआधी मी अनेक सीआरपीएफ जवानांची भेट घेतली होती. त्यांच्याबद्दल मिळालेल्या माहितीमुळं वीर जवानांच्या प्रती असलेला आदर कैक पटीनं वाढला. शहीद जवानांच्या कुटुंबीयांचं दुःख मी समजू शकतो,' असंही ते म्हणाले.

## दोन पालिका शाळांच्या दुरुस्तीवर ९ कोटी खर्च

**मुंबई -** भायखळा येथील ११४ वर्षांपूर्वी बांधलेली मदनपुरा पालिका शाळा, तर ४० वर्षांपूर्वीच्या मोहम्मद उमर रज्जाब पालिका शाळेच्या इमारतींची अनुक्रमे ३.४७ कोटी रुपये व ५.६७ कोटी रुपये असे एकूण नऊ कोटी रुपये खर्च करून दुरुस्ती करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला असून त्यावर स्थायी समितीने शिक्कामोर्तब केले आहे. या शाळा इमारतींचा पुनर्विकास करण्याऐवजी कोटय़वधी रुपये खर्च करून दुरुस्ती करण्यात येत असल्याबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे.

भायखळा पश्चिम परिसरात १९०५ मध्ये मदनपुरा पालिका शाळेची दुमजली इमारत बांधण्यात आली होती. ही दगडी इमारत पुरातन वास्तूसारखी भासते. या शाळेमध्ये २३ खोल्या आहेत. या इमारतीमधील उर्दू आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये ३८९



विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ही इमारत धोकादायक बनल्यामुळे त्याची दुरुस्ती करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. आता दुरुस्तीनंतर शाळेत बास्केटबॉल मैदान, खुले प्रेक्षागृह, छोटे फुटबॉल मैदान, इकोप्लेक्स खेळाचे ठिकाण विकसित करण्यात येणार आहे. शाळेच्या दुरुस्तीसाठी निविदा प्रक्रिया राबवण्यात आली असून कंत्राटही देण्यात आले आहे. मात्र, ११४ वर्षांपूर्वी बांधलेल्या शाळेच्या इमारतीची पुनर्बांधणी करण्याची गरज असताना ३.४७ कोटी रुपये खर्च करून तिची दुरुस्ती करण्यात येत आहे. मात्र याबद्दल एकाही नगरसेवकाने स्थायी समितीमध्ये प्रशासनाला जाब विचारला नाही हे विशेष.

याच परिसरात १९७८ मध्ये बांधण्यात आलेल्या मोहम्मद उमर रज्जाब मनपा शाळेच्या इमारतीची दुरुस्ती करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला असून या एक मजली इमारतीमध्ये ५९ खोल्या आहेत. सुमारे ४१ वर्षांपूर्वी बांधलेली ही इमारत मोडकळीस आली असून शाळेच्या दुरुस्तीसाठी पाच कोटी ६७ लाख ६१ हजार रुपयांचे कंत्राट देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला. त्यावर स्थायी समितीने शिक्कामोर्तब केले आहे.

या दोन्ही शाळांचे प्रस्ताव स्थायी समितीच्या बैठकीत सादर करण्यात आले होते. मात्र या जुन्या शाळांचा पुनर्विकास करण्याऐवजी कोटय़वधी रुपये खर्च करून दुरुस्ती का करण्यात येत आहे, असा प्रश्न एकाही नगरसेवकाने उपस्थित केला नाही.

# मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प आचारसंहितेमुळे अडचणीत

**मुंबई -** लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जाहीर होण्याची शक्यता आहे. परिणामी, महापालिकेच्या अर्थसंकल्पाला महासभेची मंजुरी मिळण्यासाठी थेट जून महिना उजाडणार आहे. त्यानंतर पुन्हा विधानसभेची निवडणूक जाहीर झाल्यास विकासकामांना ब्रेक लागणार आहे. असे झाल्यास सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील तरतूद वाया जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे नगरसेवकांमध्ये अस्वस्थता असून आचारसंहितेपूर्वी अर्थसंकल्पाला झटपट मंजुरी देण्याची लगबग सुरू आहे.

सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्प ३० हजार ६९२ कोटींचा होता. यंदाचे वर्ष निवडणुकीचे असल्याने जास्तीतजास्त निधीचा वापर विकासकामांवर करण्याचा लोकप्रतिनिधींचा भर आहे.




***सर्वपक्षीय गटनेत्यांना देणार प्रतिनिधित्व***

स्थायी समितीमध्ये चर्चा झाल्यानंतर मंजुरी देऊन अर्थसंकल्प महासभेपुढे पाठविण्यात येतो. आपल्या विभागातील विकासकामांसाठी जास्तीतजास्त निधी मिळविण्याकरिता नगरसेवक आपले प्रश्न या चर्चेत मांडत असतात. आपल्या विभागाचे गाऱ्हाणे मांडण्याची संधी मिळावी यासाठी नगरसेवक चर्चेत सहभाग घेतात. त्यामुळे अर्थसंकल्पावरील चर्चा बरेच दिवस सुरू राहते. मात्र या वेळेस सर्वपक्षीय गटनेत्यांनीच आपल्या पक्षाच्या नगरसेवकांच्या वतीने चर्चेत सहभाग घेऊन त्यांचे प्रश्न मांडावेत, असा विचार सुरू आहे. मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात चर्चा आटपून अर्थसंकल्प मंजूर करण्याची लगबग सुरू आहे.

# सोन्याची झळाळी घटली, देशात आयात घसरली

**नवी दिल्ली -** लग्नसराई व सणासुदीच्या निमित्ताने, तसेच प्रदीर्घ परंपरा असल्याने सोने खरेदीमध्ये आघाडीवर असलेल्या भारताने चालू आर्थिक वर्षात मात्र या मौल्यवान धातूकडे काहीशी पाठ फिरवल्याचे दिसत आहे. चालू आर्थिक वर्षामध्ये एप्रिल ते जानेवारी या कालावधीत भारताच्या सोने आयातीमध्ये पाच टक्के घट नोंदवण्यात आली आहे. केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीतून ही बाब स्पष्ट झाली आहे.

एप्रिल २०१८ ते जानेवारी २०१९ या कालावधीमध्ये भारताने २६.९३ अब्ज अमेरिकी डॉलर किंमतीचे सोने आयात केले. त्यापूर्वीच्या आर्थिक वर्षात म्हणजे २०१७-१८मध्ये भारताने २८.२३ अब्ज अमेरिकी डॉलर किंमतीची सोनेआयात केली होती, असे या आकडेवारीत म्हटले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारामध्ये सोन्याच्या किमतीमध्ये घसरण झाल्याने आयातीचे प्रमाण कमी झाले असल्याची शक्यता विश्लेषकांनी व्यक्त केली आहे. २०१८च्या अखेरच्या तीन महिन्यांमध्ये या आयातीत कमालीची घट झाल्याचे दिसून आले. मात्र नववर्षाच्या पहिल्याच महिन्यात सोन्याच्या आयातीत ३८.१६ टक्क्यांनी वाढ झाली व २.३१ अब्ज अमेरिकी डॉलरची आयात नोंदवली गेली.

***निर्यातीतही घसरण***

भारत हा जगातील आघाडीचा सोनेआयात करणारा देश आहे. भारतात दरवर्षी सातशे ते आठशे टन सोने आयात होते. देशांतर्गत सोन्याची मागणी ही प्रामुख्याने दागिने उत्पादक, हिरे व्यावसायिक यांच्याकडून होणाऱ्या मागणीची पूर्तता करण्यासाठी केली जाते. मात्र गेल्या वर्षी या क्षेत्राकडून होणाऱ्या मागणीतही घट झाल्याचे दिसत आहे. याशिवाय हिरे व दागिने उत्पादकांकडून होणाऱ्या निर्यातीमध्येही एप्रिल ते जानेवारीदरम्यान चार टक्क्यांची घसरण झाली आहे. या १० महिन्यांत आतापर्यंत ३२.९ अब्ज अमेरिकी डॉलर किंमतीच्या सोन्याची निर्यात झाली आहे.

***तुटीवर परिणाम***

चालू खात्यातील तूट (आयात व निर्यातीमधील तफावत) हा सरकारच्या डोकेदुखीचा एक विषय आहे. सोनेखरेदीची प्रदीर्घ परंपरा असलेल्या आपल्या देशात सोन्याची आयात कमी व्हावी व पर्यायाने चालू खात्यातील तूट नियंत्रणात रहावी यासाठी सरकार नेहमी प्रयत्नशील असते. याचाच एक भाग म्हणून सोन्यावर १० टक्के आयातशुल्कही आकारण्यात येते. चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या



तिमाहीअखेर चालू खात्यातील तुटीचे जीडीपीच्या तुलनेतील प्रमाण २.९ टक्क्यांवर पोहोचले आहे.

***किमतीमध्ये मात्र सातत्याने वाढ***

सोन्याच्या किमतीमध्ये मात्र सातत्याने वाढ होताना दिसत आहे. गेल्या आठवड्याच्या अखेरीस शुद्ध सोन्याचा भाव प्रतितोळा ३३३२५वर पोहोचला. आयात घटल्याने तसेच, रुपयाच्या अवमूल्यनामुळे सोन्याच्या भावात वाढ होत असल्याचे मत सराफ बाजारातील विश्लेषकांनी व्यक्त केले आहे. रबी हंगामाच्या पिकांमुळे फेब्रुवारी ते एप्रिल या कालावधीमध्ये सोन्याच्या मागणीमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे.

# आभासी चलनाद्वारे अनेकांची कोट्यवधींची फसवणूक

**मुंबई -** 'कॅश कॉइन' या आभासी चलनामध्ये (क्रिप्टो करन्सी) गुंतवणूक करण्याच्या नावाखाली अनेकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या टोळीतील चौघांना मुंबई गुन्हे शाखेच्या पथकाने गुजरात येथून शनिवारी अटक केली. त्यांचे चार साथीदार अद्याप फरार असून गुंतवणूकदारांचे पैसे त्यांनी विविध बँक खात्यांमध्ये जमा करून त्याचा गैरवापर केल्याचे उघडकीस आले आहे.

गुजरातमधील व्यापारी उमेशचंद जैन आणि त्यांच्या काही मित्रांना 'कॅश कॉइन' या आभासी चलनामध्ये गुंतवणूक केल्यास साठ दिवसांत दुप्पट नफा मिळतो, असे समजले. त्यांनी अशा प्रकारच्या योजनेमध्ये गुंतवणुकीसाठी पैसे स्वीकारणाऱ्या काही इसमांशी संपर्क साधला. बोरिवली येथील गोकुळ आनंद या हॉटेलमध्ये गुंतवणूकदार आणि त्यासाठी पैसे घेणाऱ्यांची बैठक झाली. जैन आणि त्यांच्या मित्रांनी जवळपास एक कोटी १२ लाखाची गुंतवणूक केली. वर्ष उलटून गेले तरी काहीच परतावा न मिळाल्याने त्यांनी मुंबई गुन्हे शाखा युनिट १२ येथे लेखी तक्रार केली. प्राथमिक तपासामध्ये फसवणूक झाल्याचे समोर येताच पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला.

तपासादरम्यान गुंतवणूकदारांनी दिलेले धनादेश विविध कंपन्यांच्या नावावरील बँक खात्यांमधून वटवण्यात आल्याचे उघड झाले. त्याआधारे युनिट १२ च्या पथकाने गुजरातमधून चौघांना अटक केली. संजय सोनटक्के, रजनीकांत कुबावत, अल्पेश भारोडिया, किरणकुमार पंचसारा अशी अटक केलेल्या चौघांची नावे असून त्यांच्या चार साथीदारांचा शोध पोलिस घेत आहेत. या टोळीने जैन यांच्याप्रमाणेच इतरही अनेकांना फसविले असण्याची शक्यता असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे.

## मोबाइल गेम खेळू न दिल्याने विद्यार्थिनीची आत्महत्या

**मुंबई -** आईने मोबाइल गेम खेळ न दिल्याने रागाच्या भरात सातवीतील विद्यार्थिनीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सांताक्रुझ येथे घडली. विशेष म्हणजे, आई रागावल्यानंतर ही मुलगी घर सोडून गेली होती. मात्र, त्याच दिवशी रात्री तिच्या पालकांनी तिला शोधून घरी आणले होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ही मुलगी वाकोल्यातील रावळपाडा परिसरातील



राहणारी होती. आत्महत्येच्या आदल्या दिवशी ती भावंडांसह मोबाइलमध्ये गेम खेळत होती. त्या वेळी तिच्या आईने मोबाइल हिसकावून घेतला. याचा राग आल्याने ही मुलगी घरातून निघून गेली. आईवडील व शेजाऱ्यांनी बरीच शोधाशोध केल्यानंतर रात्री याच परिसरात ती सापडली. पालकांनी तिला घरी आणून तिची समजूतही काढली. मात्र, दुसऱ्या दिवशी सायंकाळी तिने घरातच गळफास घेतला. वाकोला पोलिसांनी या प्रकरणी सध्या तरी अपघाती मृत्यूची नोंद केली आहे. मात्र, या प्रकरणाचा अधिक तपास करण्यात येत आहे.

***तरुणी घरातून बेपत्ता***

अशाच आणखी एका घटनेत, वडिलांनी मोबाइल वापरू न दिल्याने बारावीतील एका विद्यार्थिनी घरातून निघून गेल्याची घटना बोरिवली परिसरात घडली. ही मुलगी सतत मोबाइलमध्ये गुंतून असे. समाजमाध्यमांवर मित्रमैत्रिणींशी गप्पा मारण्यातच तिचा वेळ जात असे. ती महाविद्यालयातही वारंवार गैरहजर राहात असल्याची तक्रार महाविद्यालयातून आल्यानंतर तिच्या वडिलांनी तिचा मोबाइल काढून घेतला. याच रागातून ती १० फेब्रुवारीला घरातून निघून गेली. पोलीस तिचा शोध घेत आहेत. दरम्यान, या मुलीने आधीही तीन वेळा घरातून निघून जाण्याचा प्रयत्न केला होता, अशी माहिती हाती येत आहे.

पृष्ठ १ वरुन

## यूएलसीची ६०० कोटींची जमीन विकली...

झाल्याची शक्यता सूत्रांनी वर्तवली आहे. काशिमीरा येथील महाजनवाडी भागात साडेचौदा एकर जमीन ही झवेरी कुटुंबीयांच्या नावे होती. नागरी जमीन कमाल धारणा कयद्याच्या कलम २० अन्वये सदर जमीन हस्तांतरणास बंदी होती. असे असताना सुमारे १० वर्षांपूर्वी या जमिनीची नोंदणीकृत कराराने विक्री करण्यात आली.

याप्रकरणी शासनस्तरावर झालेल्या तक्रारीनंतर शासन आदेशाने ठाणे नागरी संकुलन विभागातील सहायक नगररचनाकार नितीन जाधव यांच्या फिर्यादीवरून काशिमीरा पोलीस ठाण्यात आशीष चंद्रसेन झवेरी, नंदिता चंद्रसेन झवेरी ऊर्फ नंदिता प्रवीण देसाई, यामिनी रामनिक कपाडिया, अनिता भाटिया व शालिनी चंद्रसेन झवेरी यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वास्तविक, सदर जमीन संघवी बिल्डर्सला नोंदणीकृत करारनाम्याने विक्री करण्यात आली असून, याठिकाणी संघवी इकोसिटी नावाने तब्बल २२ मजल्यांच्या सात टॉवरचा गृहनिर्माण प्रकल्प महापालिकेने मंजूर केला आहे. यातील दोन विंगचे काम पूर्ण होऊन सदनिकांची विक्री झालेली आहे. आता गुन्हा दाखल झाल्याने हा बांधकाम प्रकल्पसुद्धा अडचणीत येण्याची शक्यता आहे. कारण, यूएलसीच्या कलम २० खालील जमीन हस्तांतरणास बंदी आहेच; शिवाय यात शासनाला सदनिका देय असतात. आर्थिक दुर्बल घटकांसाठी मंजूर सदनिकांचीच बांधणी व विक्री करण्याची अटही असते.

**अधिकारी, बिल्डरच्या चौकशीची मागणी**

याआधी भाईंदर पश्चिम भागातील यूएलसी जमीन घोटाळ्याप्रकरणी ठाणे गुन्हे शाखेने गुन्हा दाखल करून, काही बिल्डरांना अटक केली होती. यूएलसी घोटाळ्याच्या अन्य तक्रारीसुद्धा प्रलंबित आहेत. या गुन्ह्यात अजून तरी केवळ जमीनविक्री करणाऱ्यांनाच आरोपी बनवले आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणात संबंधित असलेले विविध विभागांचे अधिकारी, बिल्डर आदींची सखोल चौकशी करून यात गुंतलेल्यांसह इतरांवरही गुन्हा दाखल करण्याची मागणी होत आहे.

## 'रयतेचा वाली, जाणता राजा'...

समजावे, असा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. या कार्यक्रमात सकाळी काशीमिरा येथील अश्वरूढ शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून 'बाईक' रॅलीच्या स्वरूपात भव्य मिरवणूक काढण्यात येईल. सदर मिरवणूकीत अनेक प्रकारचे चित्ररथ, महाराष्ट्रातील संस्कृती, खेळ, ढोल-ताशांचे प्रदर्शन करून काशीमिरा, गोल्डन नेस्ट, भाईंदर (प.), बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा- भाईंदर पोलिस ठाणे- रेल्वे स्टेशन- भाईंदर (पूर्व) नवघर हनुमान मंदिर- इंद्रलोक -हटकेश मार्ग पुन्हा काशीमिरा नाका या मार्गे जल्लोषात मिरवणूक काढण्यात येईल.

सायंकाळी हळदी-कुंकू देऊन महिलांचे स्वागत, मल्लखांब, ऐतिहासिक पुस्तक दर्शन व विक्री, पोवाडा, युवानुभूती असा संगीतमय कार्यक्रम, शिव-जन्मोत्सव सोहळा, सत्कार समारंभ व शिवरूद्राचे दिग्विजयी तांडव नामे शिवचरित्र सांगणारा संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात येईल. सदर कार्यक्रम आमच्या कार्यकर्त्यांच्या व महाराष्ट्र संस्कृती उपास, शिवप्रेमींच्या सहकार्याने मिरा-भाईंदरच्या मध्यभागी असलेल्या स्व. बाळासाहेब ठाकरे उद्यानावर आयोजित करण्यात येत आहे. पूर्व नियोजनानुसार महाराष्ट्राची अस्मिता वृद्धिंगत करणारा, **सदर भव्य-दिव्य कार्यक्रम मंगळवार दि. १९ फेब्रुवारी २०१९ रोजी साजरा करण्यात येणार होता. पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांच्या आत्मघातकी हल्ल्यामुळे झालेल्या राष्ट्रावरील आघातानंतर ओढावलेल्या शोकाकूल परिस्थितीत त्यात बदल करून हा कार्यक्रम याच स्वरूपात शनिवार दि. २३ मार्च २०१९ रोजी साजरा करण्यात येईल.**

## शहिदांच्या नावावर फसवणूक करणाऱ्या वेबसाईटपासून सावधान!

पुलावामा दहशतवादी हल्ल्यामध्ये देशाचे ४० पेक्षा जास्त जवान शहीद झाले आहेत. या घटनेनंतर देशभरातील नागरिक शहीद कुटुंबियांच्या मदतीसाठी पुढे आले आहेत. परंतु, काही समाजकंटक मदत करणाऱ्या नागरिकांची आर्थिक फसवणूक करत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे मदत करणाऱ्या नागरिकांच्या भावनांशी खेळले जात असून अशा समाज कंटक लोकांकडून मदत करणाऱ्या नागरिकांची फसवणूक होत असल्याचे राजनाथसिंह यांनी सांगितले. त्यामुळे अशा लोकांपासून सावध राहण्याचा सल्ला त्यांनी दिला आहे.

# संपादकीय... विसंवाद भोवला



संपादकः-
दिपक मोरेश्वर नाईक

जम्मू-काश्मीरमध्ये राज्यपाल राजवट अमलात आल्यानंतर तेथे जी काही प्रचंड राजकीय पोकळी निर्माण झाली, त्याचा फायदा दहशतवादी गट लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर घेणार होते, हे साहजिकच आहे. कारण, राज्यपाल राजवटीने काश्मीर खोऱ्यातील राजकीय पक्षांचा जनतेशी संपर्क तुटल्याने निर्माण झालेल्या असंतोषाला पुन्हा भडकवणे, त्यात भरपूर तेल ओतणे आणि त्यातून संपूर्ण देशातल्या राजकारणाला वेगळे वळण देणे ही दहशतवाद्यांची रणनीती होती, ती त्यांनी पुलवामा हल्ल्यातून साध्य केली. पण या पलीकडेही गेल्या काही महिन्यांत काश्मीर खोरे, पाकिस्तान व अफगाणिस्तानात अशा काही राजकीय घडामोडी दिसून आल्या आहेत की त्याकडे ना आपल्या परराष्ट्र खात्याने, ना संरक्षण खात्याने ना गृह खात्याने गंभीरपणे पाहिले ना त्यांना दहशतवादी संघटनांच्या बदललेल्या स्ट्रॅटेजीकडे चाणाक्षपणे पाहता आले. पहिली घडामोड तालिबानला अफगाणिस्तानात चर्चा करण्यासाठी अवकाश देणे ही आहे. तालिबानशी संवाद व्हावा म्हणून अमेरिकेच्या आग्रहाने अफगाणिस्तान, अमेरिका व पाकिस्तानदरम्यान गेले काही महिने चर्चेच्या फैरी झडत होत्या. त्याचा परिपाक म्हणजे तालिबानशी बोलणी करण्यास सर्व पक्ष तयार झाले आणि त्याची तशी औपचारिक घोषणाही झाली. याचा परिणाम असा की, अफगाणिस्तानच्या



राजकारणात तालिबानच्या भूमिकेला अधिकृत स्थान दिले गेले आणि त्याचा भारताला शह बसला. दुसरा परिणाम, तालिबानला राजकीय प्रक्रियेत आणल्याने काश्मीर खोऱ्यातील दहशतवादी संघटनांना पाकव्याप्त काश्मीर ते वायव्य पाकिस्तान अशा मोठ्या भौगोलिक प्रदेशाचा फायदा मिळाला आहे. गुरुवारी पुलवामामधील सीआरपीएफच्या तुकडीवर आत्मघाती हल्ला करत जैश-ए-मोहंमदने हा फायदा उचलला, असे म्हणण्यास वाव आहे. असा हल्ला करून जैशने काश्मीर खोऱ्यात आपले राजकीय वजन असल्याचे दाखवून दिले ही भारतासाठी चिंताजनक बाब आहे. जैशचे काम पाकव्याप्त काश्मीरमधील बहावलपूर येथून चालते हे सर्वश्रुत आहे, पण या संघटनेचे केवळ पाकिस्तानशी सख्य नसून ते चीनशीही जुळले आहे, हे समजून घेतले पाहिजे. गेली तीन वर्षे काश्मीर खोऱ्यात जैशच्या कारवाया दिसल्या नव्हत्या. ही संघटना थंड असल्याचे म्हटले जात होते. पण पुलवामा हल्ल्यातून असे दिसून आले की, जैशने तालिबानकडून दहशतवादी हल्ल्यांची काही नवी समीकरणे शिकून घेतली आहेत. तालिबान, इसिसकडून अफगाणिस्तान, इराक, सिरियामध्ये जसे आत्मघाती हल्ले केले जातात त्या स्वरूपाचा हल्ला जैशने पुलवामामध्ये घडवून आणला. काश्मीरमध्ये आजपर्यंत अशा प्रकारची स्फोटके घेऊन आत्मघाती हल्ले झाले नव्हते. आज पुलवामा हल्ल्यावरून देशभरात पाकिस्तानविरोधात जो संताप व्यक्त केला जात आहे, पाकिस्तानला रोखठोक उत्तर द्यावे, असा सरकारवर दबाव आणला जात आहे तो एकाअर्थी योग्य व रास्त वाटत असला तरी जैशच्या पुनरुज्जीवनामागे चीन आहे आणि चीनच्या मदतीशिवाय एवढा मोठा हल्ला काश्मीरमध्ये होऊ शकत नाहीत, याकडे डोळेझाक करता येणार नाही. वास्तविक हा हल्ला इतका भयंकर असूनही चीनने नेहमीप्रमाणे रुक्षपणे सरकारी भाषेत हल्ल्याचा निषेध करत जैशचा म्होरक्या मसूद अझहर याच्यावर बंदी घालणार नसल्याचे स्पष्ट केले. गेल्या काही वर्षांत मसूद अझहर हा चीनला का प्यारा झाला, चीन आपली प्रचंड राजनैतिक शक्ती तीसुद्धा आंतरराष्ट्रीय पातळीवर अझहरच्या मागे पणाला लावून काय साध्य करते आहे, याचा आपल्या परराष्ट्र खात्याने, संरक्षण खात्याने विचार केला पाहिजे. पुलवामा हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला दिलेला 'मोस्ट फेवर्ड नेशन' दर्जा काढून घेतला. यामुळे पाकिस्तानची आर्थिक पातळीवर नाकेबंदी होईल, मात्र दहशतवाद्यांचे कंबरडे मोडेल असे म्हणता येणार नाही. शिवाय सरकारवर पाकिस्तानसोबतचा सिंधू पाणीवाटप करार रद्द करण्याचाही दबाव आणला जात असला तरी या निर्णयाचे तोटे व त्यातून निर्माण होणारे नवे प्रश्न यामुळे काश्मीरमधील दहशतवाद थांबेल याची कसलीही खात्री नाही. काश्मीर खोऱ्यात सर्व प्रकारचा संवाद थांबला आहे. तेथील जनतेच्या हिताचे प्रश्न जोपर्यंत राजकीय पक्ष हाती घेत नाहीत, लोकांना ते उत्तरदायी राहत नाहीत; तोपर्यंत काश्मीर दहशतवादात अधिक होरपळत जाणार आहे. या घडीला काश्मीरमध्ये राज्यपाल राजवट असल्याने ते पोलिस व लष्कराच्या ताब्यात गेले आहे. ही परिस्थिती हिंसक प्रतिक्रियांना आमंत्रण देणारी ठरते. गुरुवारचा हल्ला म्हणजे १९८९ मध्ये काश्मीर जसे जळत होते त्याची आठवण करून देणारा होता, हे स्थानिकांचे म्हणणे त्या दृष्टीने पूरक ठरावे. जर असे असेल तर सर्व पक्षांनी आपल्या भूमिका बाजूला ठेवून काश्मीरच्या हितासाठी नवे सुसंवादी धोरण राबवण्याची गरज आहे. दुर्दैवाने अशा धोरणाच्या आणि आपसातील ऐक्य व संवादाच्या अभावामुळेच पाकिस्तान, चीन आणि दहशतवाद्यांचे फावले.

# पाकला जरबच गरजेची



**भारतीय लष्करातील २,५०० जवानांच्या ताफ्यावर साडेतीनशे किलो स्फोटके भरलेली कार सोडून, त्यातील ४४ जणांच्या केलेल्या हत्येची जबाबदारी जैश-ए-महम्मद या दहशतवादी संघटनेने घेतली असली, तरी या भीषण हल्ल्यामागे पाकिस्तानचा हात आहे हे उघड आहे. मुळात या हल्ल्याचे स्वरूप नेहमीचे नसून तालिबानी आहे आणि त्याचमुळे या हल्ल्याचा संबंध तालिबान्यांची सोबत करणाऱ्या पाकिस्तानशी आहे, असे म्हणता येणार आहे. या हल्ल्याला जशास तसे नव्हे, तर त्याहून जोरकस उत्तर भारताकडून दिले जाणे व या हल्लेखोरांना कायमची जरब बसेल, अशी शिकवण देणे आता आवश्यक झाले आहे.**

भारताचे एक लेफ्टनंट जनरल सारंग यांनी भारतीय लष्कराने आपल्या पथकांची ने-आण करताना योग्य ती खबरदारी घेतली नाही, असे म्हटले असले, तरी त्यामुळे हल्लेखोरांचा उद्देश व पाकिस्तानवरील आरोप खोटा ठरत नाही. शिवाय आपल्या लष्कराच्या निष्काळजीपणाची खबरबात जैश किंवा पाकिस्तानपर्यंत पोहोचत असेल, तर त्याची कारणे आणखी खोलात जाऊन तपासावी लागणार आहेत. देशातील सगळे पक्ष व जगातील सारे देश या हल्ल्याचा निषेध करायला एकवटले असले, तरी त्याचा पाकिस्तानवर काही परिणाम होईल आणि जैश किंवा तालिबानसारख्या संघटनांना त्यातून धडा मिळेल, याची अजिबात शक्यता नाही. 'दहशत' हेच या संघटनांचे सर्वात मोठे अस्त्र आहे आणि त्याचा धाक त्यांनी अमेरिकेसह साऱ्या जगाला घालून ठेवला आहे. त्यातून पाकिस्तानात दिखाऊ लोकशाही काम करीत असली, तरी तेथील सत्तेची सारी सूत्रे लष्कराच्या हातात आहेत आणि या लष्कराचा भारतद्वेष टोकाचा आणि जुना आहे. अफगाणिस्तानातून अमेरिका माघार घेत असल्यामुळे पाकचे तिकडचे बळ वाढले आहे. अमेरिकेची जागा रशियाने भरून काढली, तरी रशियाही आता आपला पूर्वीसारखा विश्वसनीय मित्र राहिला नाही. पूर्वेला पाकिस्तानच्या पाठीशी चीन आहे आणि त्याने पाकिस्तानला लष्करी बळ पुरविण्याचे अभिवचन दिले आहे. पाकिस्तानच्या शस्त्रागारातही २७५ अणुबॉम्ब सज्ज असून, त्याची क्षेपणास्त्रे दीर्घ पल्ल्याचा मारा करणारी आहेत. ही स्थिती भारतासाठी चिंताजनक असून, गेल्या चार वर्षांत त्याने गमावलेले मोठे मित्र त्याला पुन्हा जवळ करण्याची गरज सांगणारे आहे. नाम परिषद राहिली नाही आणि एकही बडी सत्ता आज आपल्यासोबत नाही. ही स्थिती भारताला आपले युद्ध व संरक्षण स्वबळावर लढावे व करावे लागेल, हे सांगणारी आहे. त्यासाठी लष्करच नव्हे, तर साऱ्या देशाला त्यागासाठी सिद्ध व्हावे लागणार आहे. 'पाकिस्तानला धडा शिकवू, हे बलिदान व्यर्थ जाणार नाही' ही भाषा देशाचा उत्साह वाढविणारी असली, तरी ती युद्धात कामी येत नाही. काही काळापूर्वी भारताने सर्जिकल स्ट्राइक करून पाकिस्तानला एक धडा दिला होता. त्याचा आम्ही बदला घेऊ, असे तेव्हाच पाकिस्तानने जाहीर केले होते. त्याने आपला शब्द खरा केला आहे. आपण मात्र त्याबाबत गाफील राहिलो आहोत. पंतप्रधान निवडणूकमग्न, संरक्षणमंत्री काहीएक न समजणारे आहेत, जेटलींनी ते खाते सोडून दिलेले आणि सुषमा स्वराज यांना ते मागूनही न मिळालेले. मंत्रिमंडळातील सारेच जण या विषयाबाबत भरपूर अनभिज्ञ असल्याने, लष्करी अधिकारी व पंतप्रधान यांच्यावरच या साऱ्या बंदोबस्ताची तयारी करण्याची जबाबदारी आहे. राफेलची विमाने येतील तेव्हा येतील, पर्रीकरांना हव्या असलेल्या तोफा यायचा तेव्हा येतील आणि रशियाची लष्करी मदतही येईल तेव्हा येईल. आपणच आता आपल्या संरक्षणासाठी सिद्ध झाले पाहिजे. हा इशारा येथे देण्याचे कारण आपल्या लष्कराने सरकारकडे केलेल्या आर्थिक मागणीचे व ती अर्थमंत्रालयाने पूर्ण न केल्याचे आहे. यंदाच्या आर्थिक वर्षात भारतीय लष्कराने सरकारला ४१ हजार कोटी रुपये संरक्षण सज्जतेसाठी मागितले होते. ही रक्कम नवी शस्त्रे विकत घेण्यावर खर्च होणारी नव्हती, तर जुनी झालेली व बऱ्याच अंशी निकामी होत असलेली शस्त्रे दुरुस्त करण्यासाठी लष्कराने मागितली होती. ती मागण्यासाठी लष्कराचे दुसऱ्या क्रमांकाचे सर्वश्रेष्ठ अधिकारी संसदेच्या समितीसमोर आले होते. या समितीला दिलेल्या माहितीत हे अधिकारी म्हणाले, 'आपले निम्म्याहून अधिक रणगाडे आता निकामी बनले आहेत. जे चालू आहेत, त्यांच्यातही मोठ्या दुरुस्तीची गरज आहे. सैनिकांना अत्याधुनिक बंदुका देण्याची क्षमता आज आपल्याजवळ नाही. शिवाय बंदुकाच नव्हे, तर बंदुकांना लागणाऱ्या गोळ्याही आपल्याकडे पुरेशा नाहीत. पाकिस्तान आणि चीन यांना एकाच वेळी निकराचे तोंड द्यावे लागेल, तर त्यासाठी लागणारा आपला दारूगोळा जेमतेम दहा दिवस पुरेल एवढा आहे. (निकराचा लढा याचा लष्करी अर्थ इतर वेळी जेवढा दारूगोळा वापरावा लागतो, त्याहून तीनपटीने अधिक तो ज्यात वापरावा लागतो तो आहे) ही स्थिती लष्कर व देश या दोहोंसाठीही कमालीची चिंताजनक आहे.' वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्याचे भाषण ऐकून संसदेची संबंधित समितीच कमालीची अस्वस्थ व बेचैन झाली होती. मात्र, लष्कराच्या त्या गरजा सरकारने अद्यापही पूर्ण केल्या नाहीत, हे आजचे दुर्दैवी वास्तव आहे. आजचे जग केवळ एका राष्ट्राच्या युद्धक्षमतेचे राहिले नाही. त्यासाठी त्याला शस्त्रांसोबतच बडे व विश्वसनीय मित्रही जवळ बाळगावे लागतात. त्यामुळे जुने व दूर गेलेले मित्र पुन्हा मिळविण्याचा प्रयत्न करणे भारतासाठी गरजेचे आहे. अमेरिकेचा विश्वास नाही, रशिया दूर आहे आणि चीन वैरी आहे, ही स्थिती कमालीची निराशाजनक वाटावी अशी आहे. या स्थितीत भारताला नेपाळ, बांगला देश किंवा श्रीलंकेसारखे देश कितीशी मदत करू शकणार आहेत? पाकिस्तान हे युद्धखोर राष्ट्र आहे आणि जोवर काश्मीर आम्हाला मिळत नाही, तोवर आमचे भारताशी वैर संपणार नाही, अशी भाषा त्याने अनेकदा जाहीररीत्या बोलून दाखविली आहे. एके काळी काश्मीर प्रश्नावर रशिया भारताच्या बाजूने होता. आता रशियानेच काश्मीरच्या पाकिस्तानने बळकावलेल्या प्रदेशात त्या देशाच्या लष्करासोबत संयुक्त कवायती केल्या आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प हे खुद्द नाटो राष्ट्रांनाही त्यांचे वाटत नाहीत आणि चीनबाबत तर आपण बोलण्याचेही कारण नाही. पाकव्याप्त काश्मिरातून आपला ४६ अब्ज डॉलर्सचा औद्योगिक कॉरिडॉर बांधून पुढे नेण्याचे त्याचे काम भारताचा विरोध डावलून सुरू झाले आहे. पाकिस्तानच्या वाढत्या युद्धखोरीची कारणे या वास्तवात शोधावी लागणार आहेत. तेथील लष्करावर सरकारचे, तेथील संसदेचे वा जनतेचेही नियंत्रण नाही. उलट हे लष्करच त्या साऱ्यांवर आपली हुकूमत एखाद्या हुकूमशहासारखी गाजवत राहिले आहेत. त्याला धडा शिकवायचा, तर भारताला स्वत:चे शस्त्रबळ व सैन्यबळ यांचाच आधार घ्यावा लागणार आहे. देशाच्या रक्षणासाठी जे ४९ जवान काल शहीद झाले, त्यांचे रक्त अशा संरक्षणसिद्धतेची मागणी करीत आहे. तिच्याकडे दुर्लक्ष करणे वा ती मागणी लोक विसरतील, अशी अपेक्षा बाळगणे ही वृत्ती देशभक्तीची नसून देशद्रोहाची आहे. हे पाप आपण करणार नाही, अशी प्रतिज्ञा करून तशी हमी या राष्ट्राला या देशाच्या सरकारने व राजकारणाने देणे आवश्यक आहे. पाकिस्तानसोबत आजवर झालेली सगळीच युद्धे भारताने जिंकली आहेत. १९४७, १९६५, १९७१ आणि नंतर झालेले कारगिलचे स्थानिक युद्धही भारताने जिंकले आहेत. एवढा मार खाऊनही पाकिस्तानचे लष्कर व तेथील सरकार त्यापासून धडा घेत नसेल, तर त्याविरुद्ध मोठी कारवाई करण्याची गरज आहे. जनतेची ती मागणी आहे, लष्कराचा तो आग्रह आहे आणि तरुणांचाही तो आक्रोश आहे.

# ठाण्यातही ई-चलान प्रणाली लागू

***ठाणे – केंद्र शासनाच्या रोकडविरहित व्यवहार धोरणाचा एक भाग म्हणून ठाणे पोलिसांनी गुरुवारपासून ई-चलानप्रणाली लागू केली. पावत्या बंद करून ऑनलाइन दंड भरण्याची सुविधा देण्यात आली आहे.***



एखाद्या व्यक्तीने आतापर्यंत केलेल्या नियमभंगाची माहिती पोलिसांना या यंत्रणेमुळे जागेवरच मिळणार आहे. परवाना रद्द होण्याची, चोरीचे वाहन, बनावट परवाना असे गुन्हे उघडकीस येण्याची चिन्हे आहेत. 'एक राज्य एक चलान' अशी योजना राज्य शासनाने आखली असून त्यानुसार संपूर्ण राज्यात ई-चलानप्रणाली लागू करण्यास सुरुवात झाली आहे. गुरुवारपासून ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रातही ही योजना लागू करण्यात आली. ठाणे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्या हस्ते प्रणालीचे उद्घाटन झाले. त्या वेळी वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमित काळे आणि परिमंडळ-१चे पोलीस उपायुक्त डॉ. डी.एस.स्वामी उपस्थित होते.

ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात वाहतूक शाखेची १८ युनिट आहेत. त्यात ३०० अधिकारी, कर्मचाऱ्यांना ई-चलान यंत्रे आणि वापराचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. उर्वरित कर्मचाऱ्यांना टप्प्याटप्प्याने या यंत्रांचे वाटप केले जाणार आहे.

**टोइंग गाडय़ांवरही यंत्र**

ठाणे ते बदलापूरपर्यंतच्या टोइंग गाडीवरील कर्मचाऱ्यांनाही ई-चलान यंत्र देण्यात आले आहे. दुचाकी चालकांकडून ३०० रुपये शुल्क घेतले जाते. त्यात शासनाचे २०० रुपये आणि टोइंग गाडीच्या शंभर रुपये शुल्काचा समावेश असतो. सध्याच्या यंत्रामध्ये केवळ शासनाच्या शुल्काचा समावेश असल्यामुळे दुचाकीचालकांना २०० रुपयांची पावती दिली जाणार आहे, तर टोइंगचे शंभर रुपये शुल्क वेगळे घेतले जाणार आहे. त्यामुळे वाद होण्याची शक्यता असल्यामुळे दोन्ही शुल्क एकत्रित वसूल करून पावती देण्याची सुधारणा केली जाणार आहे, अशी माहिती पोलीस उपायुक्त अमित काळे यांनी दिली.

**सीसीटीव्हीही जोडणार**

ठाणे परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे ई-चलान यंत्राला जोडले जाणार आहेत. त्यामुळे चालकाने सिग्नल, झेब्रा क्रॉसिंग किंवा अन्य नियमांचे उल्लंघन केल्यास सीसीटीव्ही चित्रणाच्या आधारे दंड वसूल केला जाईल. काही दिवसांत ही योजना सुरू करण्यात येईल. ई-चलान यंत्रणा कारभारात पारदर्शकता यावी आणि व्यवहार रोकडविरहित असावेत, यासाठी सुरू करण्यात आल्याची माहिती पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांनी दिली.

# कल्याणमध्ये पबजीच्या वादातून बहिणीच्या होणाऱ्या नवऱ्याला भोसकले



**कल्याण -** सर्व स्पर्धकांना 'ठार' करून शेवटपर्यंत जिवंत राहण्याची स्पर्धा असलेल्या 'पबजी' गेमच्या व्यसनामध्ये अनेक तरुणमंडळी अडकली आहे. कल्याणमध्ये पबजीचे व्यसन असलेल्या तरुणाने मोबाइलचे चार्जर मिळत नसल्याने बहिणीच्या होणाऱ्या नवऱ्याला चाकूने भोसकल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

रजनीश राजभर (२७) असे आरोपी हल्लेखोर तरुणाचे नाव असून ओम भवडनाकर (३२) जखमी झाले आहेत. ओमचं आणि रजनीशच्या बहिणीचं लग्न जमलं होतं. गेल्या गुरुवारी ओम होणाऱ्या पत्नीच्या घरी गेला होता. ओमच्या होणाऱ्या पत्नीचा भाऊ रजनीश राजभर हा मोबाइलवर पबजी गेम खेळत होता. त्यावेळी मोबाइलची बॅटरी उतरल्याने त्याने मोबाइल चार्जिंगला लावला. तेव्हा चार्जरची केबल कापलेली असल्याचे दिसले. त्यामुळे तो फोन चार्ज करू शकत नव्हता. त्यावेळी त्याची बहिणी व तिचा होणारा नवरा ओम हे घरात होते.

रजनीशने बहिणीकडे चार्जरविषयी विचारणा केली, आपल्याला कल्पना नसल्याचं बहिणीने सांगितल्यावर तिनेच चार्जरची वायर कापल्याचा आरोप त्याने तिच्यावर केला. परंतु आपल्याला याबाबत काहीच माहीत नसल्याचे तिने सांगितले. त्यामुळे संतापलेल्या रजनीशने चाकूने बहिणीच्या लॅपटॉपची वायर कापली. यामुळे घरात वाद झाला. ओमही रजनीशला रागाने बोलला आणि ओमने त्याला पबजीच्या व्यसनावरून हटकले.

त्यामुळे आधीच गेम अर्धवट राहिल्याने संतापलेल्या रजनीशचा रागाचा पारा आणखी चढला. त्याने वायर कापलेल्या चाकूने थेट ओम यांच्यावर हल्ला केला आणि ओमच्या पोटात चाकू खुपसला. यानंतर ओमला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान, ओम यांनी या प्रकरणी कल्याणच्या कोळसेवाडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

# नवी मुंबई शहरात प्लास्टिकचा सर्रास वापर सुरू

**बंदीची भीती कमी; कचराभूमीत मोठ्या प्रमाणात पिशव्या**

**नवी मुंबई :** शहरात आता पुन्हा बिनदिक्कत प्लास्टिकचा मुक्त वापर सुरू झाला आहे. यात सर्वाधिक वापर फेरीवाल्यांकडून होत असून स्वीट मार्टपासून किरकोळ विक्रेते प्लास्टिकमध्ये वस्तू देत आहेत. त्यामुळे कचऱ्यातून गायब झालेले प्लास्टिक पुन्हा दिसू लागले आहे. प्लास्टिक बंदीचे काय झाले, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पर्यावरणमंत्री रामदास कदम यांनी राज्यात सरसकट प्लास्टिक बंदी केली. मात्र काही महिन्यांत निर्णयाला तात्पुरती स्थगिती दिली. मात्र तरीही ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांवरील बंदी कायम आहे. प्लास्टिक बंदीची पालिका क्षेत्रात काटेकोर अंमलबजावणी करण्यात येत होती. पालिकेने केलेल्या कारवाईत दंड म्हणून वर्षभरात ३५ लाखांची वसुली करण्यात आली होती.

आताही पालिका थेट कारवाई करत आहे, तरीही कचऱ्यात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक पिशव्या आढळून येत आहेत. बुधवारी वाशी येथे तर गुरुवारी तुर्भे भागात पालिकेने कारवाई करीत सुमारे ५० हजारांचा दंड आकारणी करण्यात आली असून यात



दुकानदारांचा समावेश होतो. या पिशव्यांचा वापर करणाऱ्यांत भाजी विक्रेत्यांचा मोठा सहभाग दिसत आहे. तसेच फेरीवाल्यांकडूनही पिशव्या दिल्या जात आहेत.

या संदर्भात काही विक्रेत्यांना विचारले असता, पिशवी दिली नाही तर ग्राहक जे पिशवी देतील त्यांच्याकडून माल घेतात. त्यामुळे आम्ही पिशव्या ठेवतो असे सांगितले.

# 'बुलेट ट्रेन'ला वसई–विरार पालिकेची आडकाठी

**राज्य सरकारविरोधात उच्च न्यायालयात जाण्याचा इशारा**



**वसई :** बुलेट ट्रेनला वसई-विरार महापालिकेने केलेल्या जोरदार विरोधामुळे राज्य सरकारविरोधात महापालिका असा तीव्र संघर्ष निर्माण झाला आहे. बुलेट ट्रेनसाठी विकास आराखडय़ात रेखांकने आणि प्रकल्पबाधितांना विकास हस्तांतर हक्क न देण्याचा महापालिकेचा प्रस्ताव राज्य शासनाने विशेषाधिकार वापरून विखंडित केला होता. पालिका विरोधावर ठाम असून राज्य सरकारविरोधात उच्च न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला आहे. बुधवारी महापालिकेने सभागृहात अभिवेदन सादर करून राज्य सरकारलाच इशारा दिला आहे.

मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे (बुलेट ट्रेन) वसई-विरार महापालिका क्षेत्रातील १४ गावांतून जाणार आहे. १७ किलोमीटर लांबीच्या या बुलेट ट्रेनमुळे ३० हजार ४५९ हेक्टर क्षेत्र बाधित होणार आहे. वसईतील स्थानिक भूमिपुत्र आणि शेतकरी विस्थापित होणार आहे. त्यामुळे वसई-विरार महापालिकेने या बुलेट ट्रेनला विरोध केला आहे. बुलेट ट्रेनसाठी विकास आराखडय़ात रेखांकने आणि प्रकल्पबाधितांना विकास हस्तांरण हक्क द्यावेत, असा राज्य शासनाने पालिकेला प्रस्ताव पाठवला होता. मात्र पालिकेने राज्य शासनाचा हा प्रस्ताव फेटाळून लावला. शासनाचे आदेश पालिकेने फेटाळण्याचा प्रस्ताव महासभेने मंजूर केला होता. राज्य शासनाने आपल्या विशेषाधिकाराने पालिकेचा हा प्रस्तावच रद्द केला आहे. त्यामुळे पालिका विरुद्ध राज्य सरकार असा संघर्ष उभा राहिला आहे.

या संघर्षाचे पडसाद बुधवारी झालेल्या महासभेत उमटले. पालिकेने याबाबत सभागृहात अभिवेदन सादर करून बुलेट ट्रेनला विरोध असल्याचे सांगितले. शासनाचा हा प्रस्ताव आयुक्तांनी सभागृहात ठेवला होता. त्याबाबत नगरसेवक यांनी आयुक्तांना धारेवर धरले. शहराच्या भल्यासाठी तुम्हा शासनालाच का विरोध केला नाही, आपल्या शहराची बाजू का मांडली नाही, असा सवाल त्यांनी केला.

बुलेट ट्रेन पालघर जिल्ह्याच्या आदिवासी भागातून जाणार आहे. आदिवसींना या ट्रेनचे तिकीट परवडणार नाही, ते या ट्रेनचा वापर करणार नाही. मग आम्ही जागा का द्यावी, असा सवाल नगरसेवक उमेश नाईक यांनी केला. भूहस्तांतरासाठी खासगी जागामालकांना चारपट मोबदला मिळणार आणि पालिका क्षेत्राला एकपट विकास हस्तांतर शुल्क दिले जाणार असून ते चुकीचे असल्याचे ते म्हणाले. या प्रकल्पासाठी आरक्षणाच्या दोन्ही बाजूस बफर झोन दर्शवण्यात आला आहे. त्यामुळे ही जमीन कोणत्याही प्रकारच्या वापरात येत नाही, बुलेट ट्रेन स्थानिकांच्या फायद्याची नाही, आधीच विविध प्रकल्पामुळे स्थानिक विस्थापित झाले आहे, असे मुद्दे मांडण्यात आले. जमिनीचे निश्चित मालक आणि भोगवटादार कोण हे ठरवणे कठीण आहे. ज्या ठिकाणांहून बुलेट ट्रेन जाणार आहे, त्या जागेवर अनधिकृत निवासी चाळी उभ्या राहिल्या आहेत. त्या जागेचा सातबारा मूळ जमीन मालकांच्या नावानेच आहे. त्यामुळे या विकास हस्तांतर शुल्काचा (टीडीआर) लाभावरून वाद निर्माण होणार आहे. फ्रेट कॉरिडॉर प्रकल्पासाठीही जागा संपादन करण्यासाठी शासनाने नोटिसा बजावलेल्या आहेत. त्यामुळे स्थानिकांमध्ये मोठा असंतोष निर्माण झालेला आहे. शहराला मेट्रोची गरज आहे बुलेट ट्रेनची गरज नाही, असे या अभिवेदनात ठामपणे सांगून विरोध करण्यात आला. पालिकेचा प्रस्ताव विखंडित करण्याचा निर्णय शासनाने मागे घेण्यात यावा, अन्यथा उच्च न्यायालयात सरकारविरोधात जाऊ, असा इशारा महापालिकेने दिला.

# वसईत दोन डेअरींवर छापे

*२५०० किलो भेसळयुक्त पनीर जप्त*



**वसई :** येथील चिंचोटी कामण रोडवर असलेल्या दोन डेअरींवर छापा टाकून गुन्हे प्रतिबंधक विभागाने २५०० किलो भेसळयुक्त पनीर जप्त केले आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी या पनीरचे नमूने तपासणीसाठी पाठविले आहेत.

बुधवारी वसईचे अप्पर पोलीस अधिक्षक विजयकांत सागर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रतिबंधक विभागाने चिंचोटी कामण रोडवर असलेल्या अजय आणि साईनाथ या दोन डेअरींवर छापा टाकला. या वेळी अन्न सुरक्षा व दर्जात्मक नियमांचे कोणत्याही प्रकारे पालन केले जात नसल्याचे आढळून आले. या पथकाने अजय डेअरी येथून अंदाजे ७०० किलो, तर साईनाथ डेअरीमधून १८०० किलो भेसळयुक्त पनीर जप्त केले.

त्याची किंमत ७ लाख ५० हजार इतकी आहे. छापा टाकलेल्या ठिकाणी अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी पनीरचे नमूने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविले आहेत.

# काही शिवसेना नेत्यांमुळे रिफायनरी विरोध बॅकफूटवर

***राजापूर- शिवसेनेच्या काही नेत्यांनी समर्थन दिल्याने रिफायनरी विरोधी आंदोलन सुरवातीला बॅकफूटवर पडले होते, अशी जाहीर कबुली शिवसेनेचे माजी सभापती, रिफायनरी विरोधी शेतकरी, मच्छीमार संघटनेचे अध्यक्ष कमलाकर कदम यांनी दिली. याबाबतचा त्यांच्या वक्तव्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने तो चर्चेचा विषय बनला आहे.***

रिफायनरी प्रकल्प रद्द करावयाचा असेल, तर शिवसेनेशिवाय पर्याय नाही, असे प्रकल्पग्रस्त ठासून सांगत आहेत. त्याचवेळी कदम यांनी शिवसेनेतील प्रकल्प समर्थकांचा हौशे-नवशे-गवशे असा एकेरीत उल्लेख करीत केलेल्या वक्तव्याने रिफायनरी विरोधाच्या मुद्द्यावरून शिवसेनेतील एकमताबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. रिफायनरीच्या विरोधात शिवसेनेने रान उठविले आहे. खासदार विनायक राऊत, आमदार राजन साळवी यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना वेळोवेळी प्रकल्पग्रस्तांसमवेत आंदोलनामध्ये उतरली. लोकांचे प्रकल्पासंबंधित मत जाणून घेण्यासाठी आलेल्या सुकथनकर समितीसमोरही राऊत, साळवी यांनी रौद्ररूप धारण केले होते. 'रिफायनरी जाणार, नाणार राहणार' अशी घोषणा करीत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी रिफायनरी विरोधात रान उठविले. अशी स्थिती



असली तरी, प्रकल्पासंबंधित शिवसेनेच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे. शिवसेनेचे माजी सभापती कदम यांच्या व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये सेनेच्या सुरवातीच्या भूमिकेबाबत त्यांनी केलेल्या वक्तव्याने त्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. रिफायनरी रद्द करायची असेल, तर शिवसेनेशिवाय पर्याय नाही, याचा त्यांनी पुनरुच्चार केला आहे. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर व्हायरल झालेल्या व्हिडिओने चर्चेला तोंड फुटले आहे. कदम यांचा व्हायरल झालेला व्हिडिओ शिवसेना विरोधकांच्या हातात कोलीत ठरण्याची शक्यता आहे. त्याआधारे शिवसेनेला टार्गेट केले जाण्याची शक्यता आहे.

# पाकिस्तानी कलाकारांना काम देऊ नका, मनसेचा इशारा

**मुंबई-** पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेना पुन्हा एकदा पाकिस्तानी कलाकारांविरोधात आक्रमक झाल्याचं दिसतंय. भारतीय संगीतकारांनी पाकिस्तानी गायक किंवा कलाकारांना भारतात काम देऊ नये, अन्यथा मनसे धडा शिकवेल असा इशारा मनसे सिने विभागाचे अध्यक्ष अमेय खोपकर यांनी दिला आहे. अद्यापही काही भारतीय म्युझिक कंपन्या पाकिस्तानी कलाकारांसोबत काम करत आहे. पाकिस्तानी कलाकारांची गाणी असलेले अल्बम बनविण्याचे काम सुरू आहे. पाकिस्तानात गाणी रेकॉर्ड करून भारतात पाठविले जातात आहेत. संबंधित कंपन्यांनी ही कामे ताबडतोब बंद करावीत, अन्यथा त्यांचा मनसे स्टाईल समाचार घेतला जाईल, असे खोपकर म्हणाले. शुक्रवारी राज्यभरात पुलवामा येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याविरोधात नागरिकांनी संताप व्यक्त केला. आत्मघातकी हल्ल्याच्या निषेधाचे



पडसाद सोशल मीडियावरही उमटले. दहशतवादी हल्ल्याचा पुण्यातील कश्मिरी तरुणांनी निषेध केला. हल्ल्यातील शहिदांचं बलिदान देशानं विसरायला नको. त्यांना मारणाऱ्यांना कधीच स्वर्ग लाभू शकत नाही.

# युतीचा चेंडू भाजपच्या कोर्टात; नेतृत्वाकडे लक्ष

**मुंबई-** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात गुरुवारी रात्री 'मातोश्री' निवासस्थानी युतीबाबत झालेला तपशील दिल्लीतील भाजप नेतृत्वाला कळविला जाणार असून, त्यानंतर युतीबाबतचा पुढील निर्णय अपेक्षित असल्याचे कळते.

गेले काही महिने युतीबाबत पडद्याआडून चर्चा झाल्यानंतर गुरुवारी मुख्यमंत्री फडणवीस थेट 'मातोश्री'वर उद्धव ठाकरे यांच्या



भेटीसाठी पोहोचले. या भेटीबाबत अत्यंत गुप्तता पाळण्यात आली होती. मुख्यमंत्री 'मातोश्री'वर येणार याची कल्पना तिथल्या अनेकांना नव्हती. या बैठकीला उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, मुख्यमंत्री फडणवीस, महसूलमंत्री चंद्रकांत पाटील, उद्योगमंत्री सुभाष देसाई एवढेच उपस्थित होते. यावेळी, भाजपच्या ताब्यातील लोकसभेच्या ज्या विद्यमान जागा शिवसेना मागत होती, त्याबाबत मुख्यमंत्र्यांनी योग्य तो खुलासा केल्याचे कळते. पालघर जागेबाबतचा आग्रह आता शिवसेनेने सोडून द्यावा याविषयीही मुख्यमंत्र्यांनी भाष्य केल्याचे कळते. विधानसभेच्या निम्म्यानिम्म्या जागा वाटून घ्यायच्या असे ठरले असले तरी त्या जागा कोणत्या असाव्यात, मित्रपक्षांना द्यायच्या जागा कोणत्या असाव्यात याविषयीही जुजबी चर्चा झाल्याचे कळते. लोकसभेनंतर भाजप विधानसभेला जाणूनबुजून युती तोडणार नाही याविषयीची भूमिकाही यावेळी मांडण्यात आल्याचे कळते. पुलवामा हल्ल्याच्या बातमीने देशात खळबळ उडाल्याने ही बैठक आटोपती घेण्यात आली. बैठकीतील चर्चा दिल्लीतील भाजपच्या नेतृत्वाच्या कानावर घातली जाईल, त्यांच्याकडून आलेल्या प्रतिसादानंतर पुढची बोलणी करू, असे सांगतच मुख्यमंत्री फडणवीस आणि चंद्रकांत पाटील 'मातोश्री'वरून बाहेर पडल्याचे समजते.

# मिरा रोडमधील मैदान खेळण्यासाठी खुले

**वसई-** मिरा-भाईंदर शहरातील आरक्षित खेळाची मैदाने टप्प्याटप्प्याने नागरिकांसाठी खुली करण्याचे आश्वासन पालिका आयुक्तांनी दिले आहे. या मागणीसाठी काही सामाजिक कार्यकर्त्यांनी एकदिवसीय साखळी उपोषण केले होते. त्यानंतर मिरा रोड येथील आरक्षण क्रमांक ३०० या जागेत मातीभराव करून तेथे मैदान तयार करण्यात आले असून नागरिकांच्या वापरासाठी खुले करण्यात आलेले आहे. तसेच शहराच्या विकास योजनेतील आरक्षित मैदानाच्या जागा टप्प्याटप्प्याने विकसित करून खेळण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येतील, असे पालिका अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. मिरा-भाईंदर शहरातील एकूण ९४ आरक्षणे खेळाच्या मैदानांची असून जेवढ्या जागा पालिकेच्या ताब्यात आल्या आहेत, त्या मुले व नागरिकांना खेळण्यास खुल्या कराव्यात तसेच मिरा रोडच्या मेरीगोल्ड वसाहतीसमोर महापालिकेचे आरक्षण क्र. ३०० हे खेळाच्या मैदानासाठी आहे. सुमारे २६ हजार ६०० चौमी क्षेत्रफळाचे हे मैदान खेळण्यास खुले करावे, अशी मागणी करीत जिद्दी मराठा संघटनेचे अध्यक्ष प्रदीप जंगम, सत्यकाम फाऊंडेशनचे कृष्णा गुप्ता, दुकान मालक संघटनेचे महेंद्र गुर्जर, बहुजन



विकास आघाडीचे निलेश साहू यांनी नुकतेच एक दिवसाचे साखळी उपोषण पालिका मुख्यलायच्या बाहेर केले. त्याची दखल घेऊन पालिकेने मैदानाबाबत लेखी आश्वासन या कार्यकर्त्यांना दिले. मिरा रोडच्या मेरीगोल्ड परिसरातील रहिवाशांना खेळाचे मैदान नसल्याने पालिकेचे हे आरक्षण लवकर विकसित करून खेळण्यासाठी तत्काळ खुले करण्याची मागणी येथील नागरिक गेले अनेक वर्षे करत होते. गेल्या १७ वर्षांपासून येथे मैदान विकसित करण्याचे सांगण्यात येत होते. पण मैदान विकसित झाले न्हवते. दोन वर्षांपासून विविध कारणांनी खेळाचे मैदान येथील मुले व नागरिकांना खुले केले जात नसल्याने लोक नाराज होते. त्यामुळे तीन महिन्यांत हे मैदान विकसित करून नागरिकांना खेळण्यास खुले करावे, अन्यथा आंदोलन करू असा इशारा नोव्हेंबर महिन्यात जंगम यांनी पालिकेस दिला होता. मैदानासाठी साखळी उपोषणाला अनेकांनी पाठिंबा दिला. त्यावर पालिका आयुक्त बालाजी खतगावकर यांनी आंदोलकांना चर्चेसाठी आपल्या दालनात बोलावले व त्यानंतर लेखी आश्वासन बांधकाम विभागाने दिले.

# 'शेतकरी आंदोलनाला दडपून टाकण्याचा सरकारचा प्रयत्न'

**मुंबई -** सरकारच्या विश्वासघाताविरोधात २० फेब्रुवारीपासून शेतकऱ्यांच्या नाशिकहून काढण्यात येणारा लाँग मार्च रोखण्यासाठी सरकारने दडपशाही सुरू केली आहे. अहमदनगर येथे लाँग मार्च काढण्याची तयारी करण्यासाठी १३ फेब्रुवारीला शेतकऱ्यांची परिषद घेऊन निवेदन दिले म्हणून किसान सभेचे राज्य सरचिटणीस डॉ. अजित नवले यांच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. त्यांना अटक करण्याच्या हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत.

अखिल भारतीय किसान सभा सरकारच्या या दडपशाहीचा तीव्र शब्दात धिक्कार करत आहे. लोकशाही चौकटीत, शांतता, आत्मक्लेश आणि सत्याग्रही मार्गाने सुरू असलेल्या शेतकरी आंदोलनाला दडपून टाकण्याचा सरकारचा हा अत्यंत निंदनीय प्रयत्न आहे. राज्यभरातील जनता हे सहन करणार नाही. कार्यकर्त्यांवर अशा प्रकारे दडपशाही करून लाँग मार्च रोखता येणार नाही. शेतकऱ्यांच्या




मागण्या मान्य करत त्यांची अंमलबजावणी करूनच हा प्रश्न सोडवावा लागेल. सरकारने ही बाब नीट समजून घेण्याची आवश्यकता आहे,असेही डॉ अशोक ढवळे यांनी म्हटले आहे.

कार्यक्रम शांततेत करा, आमची त्याला काहीच हरकत नाही असे पोलिसांनी सांगितले होते. ठरल्याप्रमाणे परिषद अत्यंत शांततेत पार पडली. निवेदन देण्याचा कार्यक्रमही अत्यंत शांततेत संपन्न झाला. असे असताना नंतर कोणाच्या इशाऱ्यामुळे या केसेस दाखल झाल्या हे राज्यभरातील शेतकऱ्यांना नक्कीच चांगले माहीत आहे. किसान सभा आणि राज्यभरातील शेतकरी या दडपशाहीचा कसून मुकाबला करतील.

# मोठ्या लष्करी हालचाली करताना यापुढे 'ही' काळजी बाळगणार

**श्रीनगर-** पुलवामा येथील दहशतवादी हल्ल्यानंतर शुक्रवारी केंद्रीय गृहमंत्रालायकडून एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. त्यानुसार आता भविष्यात ज्यावेळी सुरक्षा दलांचा ताफा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाईल तेव्हा संबंधित परिसरातील नागरी वाहतूक पूर्णपणे थांबवण्यात येईल. यामुळे नागरिकांची गैरसोय होईल. त्यासाठी आम्ही दिलगीर असल्याचे केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंह यांनी सांगितले. तसेच पुलवामा हल्ल्यात शहीद झालेल्या



जवानांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्याचे निर्देशही राजनाथ सिंह यांनी राज्य सरकारांना दिले आहेत. या हल्ल्यामुळे आमचे मनोधैर्य बिलकूल खचलेले नाही. या सगळ्याकडे आम्ही दहशतवादाविरुद्धची लढाई म्हणून पाहत असल्याचे राजनाथ सिंह यांनी म्हटले. तत्पूर्वी राजनाथ सिंह यांनी शुक्रवारी दुपारी बडगाममधील केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) मुख्यालयात जाऊन शहीद जवानांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी त्यांनी जवानांचे मृतदेह असलेल्या शवपेटीला खांदा दिला. यावेळी जम्मू-काश्मिरचे राज्यपाल सत्यपाल मलिक, लष्कराच्या उत्तर मुख्यालयाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल रणबीर सिंह त्यांच्यासोबत उपस्थित होते. राजनाथ सिंह यांनी यावेळी काश्मीरमधील परिस्थितीचाही आढावा घेतला.

# आजारी आरोपीला भेटण्यासाठी मागितली चक्क २० हजारांची लाच

**पुणे -** तुरुंगात असलेले कैदी, आरोपींना भेटण्यासाठी कारागृह पोलीस पैसे घेत असल्याचे नेहमीच सांगितले जाते. पण, नातेवाईकांच्या भेटीसाठी आसुरलेले लोक त्यांची मागणी निमुटपणे मान्य करुन पैसे देतात. पण, त्यांच्यावर शिवाजीनगर पोलीस मुख्यालयातील पोलिसांनी कडी केली. आजारी असल्याने ससून रुग्णालयात उपचार करण्यात येत असलेल्या मुलाला भेटू देण्यासाठी दोघा पोलिसांनी वडिलांकडे चक्क २० हजार रुपयांची लाच मागितली. लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने शुक्रवारी रात्री सापळा रचून या दोघा पोलिसांना रंगेहाथ पकडले. स्वप्नील भीमराव भद्रे (वय ३०, रा. विश्रांतवाडी पोलीस लाईन), अनोश आगस्टिन गायकवाड (वय २४, रा. कनक अपार्टमेंट, दौंड) अशी



पोलीस मुख्यालयाच्या पोलीस शिपायांची नावे आहेत. याबाबत लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार यांचा मुलगा शुक्रराज हा येरवडा तुरुंगात कोठडीमध्ये आहे. आपल्यावर झालेल्या अन्यायाविरोधात तुरुंगात उपोषण सुरु केले आहे. त्याची प्रकृती बिघडल्याने त्याला ससून हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आहे. तेथे त्याच्यावर उपचार सुरु आहेत. त्यांच्या बंदोबस्तासाठी स्वप्नील भद्रे आणि अनोश सबस्तीन यांची नेमणूक केली आहे.

# 'पुलवामा हल्ल्यातील स्फोटकांमध्ये RDX नव्हे तर खतांमधील रसायनांचा वापर'

**जम्मू-** पुलवामा येथे केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) ताफ्यावर झालेल्या दहशतवादी हल्ल्यासंदर्भातील महत्त्वपूर्ण दुवे आता तपासयंत्रणांच्या हाती यायला सुरुवात झाली आहे. सुरुवातीला या हल्ल्यात



आरडीएक्सचा वापर झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत होता. मात्र, प्राथमिक तपासानंतर या हल्ल्यासाठी आरडीएक्सचा वापर झाला नसून खते बनवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या रसायनांचा वापर झाल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे. आज सकाळी राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) आणि एनएसजीच्या पथकातील फॉरेन्सिक तज्ज्ञ घटनास्थळी स्फोटाच्या तपासासाठी दाखल झाले. यावेळी त्यांच्या हाती लागलेल्या पुराव्यांवरून या हल्ल्यासाठी वापरण्यात येणारी स्फोटके खतांसाठी वापरण्यात येणाऱ्या रसायनांच्या सहाय्याने बनण्यात आल्याची शक्यता समोर आली. तसेच स्फोटाची तीव्रता वाढवण्यासाठी या स्फोटकांमध्ये धातुचे तुकडे, खिळे आणि शिसाचे गोळे वापरण्यात आले होते.

या हल्ल्यातील आत्मघातकी दहशतवादी अदिल अमहद दार याच्या मृतदेहाचे परीक्षणही न्यायवैद्यक तज्ज्ञांकडून करण्यात आले. तज्ज्ञांच्या अंदाजानुसार, दहशतवाद्यांनी स्फोटकांसाठी लागणारे हे सर्व साहित्य पंजाब आणि हरियाणाच्या बाजारपेठेतून खरेदी केले असावे. स्फोटकांमधील बहुतांश साहित्य हे बाजारपेठेत सहजपणे उपलब्ध असते. त्यामुळेच तपासयंत्रणांना या कटाचा सुगावा लागला नसावा. तर दुसरीकडे सीआरपीएफनेही या हल्ल्यासंदर्भातील प्राथमिक अहवाल केंद्रीय गृहमंत्रालयाकडे पाठवला आहे. यामध्ये स्थानिकांच्या मदतीने हा हल्ला झाल्याचे म्हटले आहे. तसेच स्फोटकांमधील काही साहित्य पाकिस्तानमधून आल्याची शक्यताही सीआरपीएफच्या अहवालात वर्तविण्यात आली आहे.

# पुलवामा हल्ल्यानंतर जैश-ए-मोहम्मदची स्तुती करणाऱ्या ट्वीटमागचं सत्य



**अलीगड मुस्लीम विद्यापीठातल्या एका विद्यार्थ्याने जैश-ए-मोहम्मदची स्तुती करणारं ट्वीट केलं त्याचे मेसेज आणि फोटो व्हायरल झाले. उरी चित्रपटातल्या नायकाच्या तोंडी एक वाक्य आहे, त्यातला नायक आपल्या जवानांना विचारतो 'हाऊ इज जोश'. आणि त्याच्या प्रत्युत्तरात जवान म्हणतात 'हाय सर'. त्याच धर्तीवर त्या विद्यार्थ्याने एक वाक्य ट्वीट केलं होतं. 'हाऊ इज द जैश, ग्रेट सर.'**

गुरुवारी पुलवामामध्ये झालेल्या हल्ल्यात ऍंइचे ४६ जवान ठार झाले. या हल्ल्याची जबाबदारी जैश-ए-मोहम्मद या संघटनेनी घेतली.

त्या संघटनेच्या स्तुतीपर या विद्यार्थ्याने हे ट्वीट केल्याचं म्हटलं जात होतं. या विद्यार्थ्याला विद्यापीठाने निलंबित केलं आहे. पोलिसांनी या प्रकाराची दखल घेऊन तपासाला सुरुवात केली आहे. त्या मुलाचं ट्वीट सोशल मीडियावर शेअर होत आहे. आणि जैश-ए-मोहम्मदबाबत अनुकंपा दाखवणं हे अयोग्य असल्याचं लोकांनी म्हटलं आहे. हा हल्ला झाल्याचं समजल्याच्या काही तासातच हे ट्वीट करण्यात आलं होतं. आता हे ट्वीट काढून टाकण्यात आलं आहे. त्या विद्यार्थ्याने आपलं अकाउंट डिॲक्टिवेट केलं आहे.

## पोलिसांची प्रतिक्रिया

**या ट्वीटविरोधात अनेक तक्रारी आल्यानंतर आम्ही तक्रार दाखल केली असून आता प्रकरणाचा तपास करत आहोत. हा विद्यार्थी कोण आहे याचा आम्ही तपास करत आहोत. एकदा त्याची ओळख पटली की आम्ही पुढील कारवाई करू, असं सहाय्यक पोलीस अधीक्षक नीरज जदाऊन यांनी बीबीसीला सांगितलं. सदर विद्यार्थी अलीगड विद्यापीठाचा होता अशी कबुली विद्यापीठाच्या प्रवक्त्यांनी दिली आहे.**

**तो आमचा विद्यार्थी आहे. अशा गोष्टी आम्ही अजिबात खपवून घेत नाही. त्या विद्यार्थ्याला निलंबित करण्यात आलं आहे आणि तपास सुरू केला आहे, असं विद्यापीठानं स्पष्ट कलं आहे.**

# आता पाकिस्तानातच घुसावे लागेल : उद्धव ठाकरे

**मुंबई :** पुलवामामधील हल्ला हा केवळ दहशतवादी हल्ला नसून आपल्या गुप्तचर यंत्रणेच्या चिंधड्या उडवणारा हल्ला आहे. संपूर्ण देश बदला घेण्याची मागणी करतोय. आता केवळ तोंडाच्या वाफा दवडून चालणार नाही. सर्जिकल स्ट्राइक फक्त



पाकव्याप्त काश्मीरपर्यंत होता. पण आता पाकिस्तानातच घुसावे लागेल, अशी संतप्त प्रतिक्रिया शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिली.

उद्धव ठाकरे यांनी 'मातोश्री' निवासस्थानी पत्रकार परिषदेत शिवसेनेची भूमिका जाहीर केली. दरवेळी हल्ला झाल्यानंतर आता सोडणार नाही, अशा घोषणा देऊन दंड थोपटून दाखवतो. हे आता आणखी किती वेळ चालणार? पाच वर्षे होऊन गेलीत, असे सांगत त्यांनी केंद्र सरकारला चांगलेच खडे बोल सुनावले. हा हल्ला केवळ दहशतवादी हल्ला नाही, तर हे गुप्तचर यंत्रणेचे अपयश आहे. हल्ल्याबाबत माहितीही मिळत नसेल, तर ते काय करतात, हा प्रश्न असल्याचे ते म्हणाले.

अखिल भारतीय मानव अधिकार युनियन
सभासद नोंदणी सुरु
अध्यक्ष : श्री. दिपक मोरेश्वर नाईक मो. ८४२४९८९८९८
सचिव : श्री. विनोद दशरथ मेढे मो. ८६९२०१११९०
सदस्य नोंदणी कार्यालय - २, राजाराम अपार्टमेंट.
बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), ठाणे - ४०१ १०५

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)